कसे जगावे ?
(गझल)

कशात काही मिळेल का ते बघीत जावे
मनात ने ही हिशेब सारे करीत जावे.

नकोच चिंता उगाच त्याची, मिळेल ते ही,
खिशात जेजे असेल ते ते भरीत जावे.

सुखात खावे, मजेत प्यावे, फिरूनी यावे
जगात प्यारे सुरात सारे खुशीत गावे.

दुरावणाऱ्या जनांस त्या त्या मिठीत घ्यावे
कणाकणाने क्षणाक्षणांना लुटीत जावे.

कुणा कुणाही कधीच ना रे छळीत जावे
मनुष्यधर्मा जगात या रे जपीत जावे.

— x —

वरील रचना ही "सती जलौघवेगा" वृत्तात आहे.
याची गागावली "लगालगागा लगालगागा, लगालगागा"
अशी आहे.

कशात काही मिळेल का ते बघीत जावे.
लगाल गागा लगाल गागा लगाल गागा.

- तेजस दिगंबर लिमये
ई-१२, सृष्टी
कोथरूड पुणे